क्र.११/१३/एम-१५०. 33

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
बी.ओम.आर.डी.ओ.इमारत २रा मजला
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

प्रति,

दिनांक :- २४ मे, १९९२.

जमिन अधिकारी,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
ड्राईव्ह इन थिएटर जवळ,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

विषय :- जमिन: मुंबई उपनगर जिल्हा

बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मधील "जी आणि इ" ब्लॉकसाठी पाण्याची पाईप लाईन टाकण्यासाठी सर्विस रोड बांधण्याबाबत..

आपल्याकडील पत्र क्र.एडिएम(एल)/बीकेसी/(जीई)/नाहुदा/१८७/९२ दिनांक ११.५.९२ कृपया पहावे.

या कार्यालयाचे पत्र समक्रमांक दिनांक २२.४.९२ नुसार प्राधिकरणाकडून रु. रुपये १०/-च्या चक्रमुद्रांकित पेपरवर जरूरीचे हमीपत्र मिळाल्यामुळे बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मधील "जी" आणि "इ" ब्लॉकसाठी पाण्याची पाईप लाईन टाकण्यासाठी "एफ" ब्लॉक स.नं.२४१ मध्ये ३०० मीटर लांबीचा सर्विस रोड बांधण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास खालील अटींवर परवानगी देण्यात येत आहे.

१) प्रतिगृहीता शासन ठरविल ती जमिनीची कब्जेहक्काची रक्कम भरेल.

२) प्रतिगृहीता जमिनीचा ताबा घेतल्यापासून ते कब्जेहक्काची पूर्ण रक्कम भरण्याच्या तारखेपर्यंत ८% दराने व्याज शासनास भरेल.

३) प्रतिगृहीता वरील अटी व शर्ती तसेच शासन ज्या अतिरिक्त अटी व शर्ती लादेल त्यास बांधील असेल.

प्रश्नाधिन जमीनीचे सिमांकन करून देण्याचा सूचना नगर भुमापन अधिकारी क्रमांक ३ यांना देण्यात येत आहे. तरी पुढील कार्यवाहीसाठी नगर भुमापन अधिकारी क्रमांक ३ यांच्याशी संपर्क साधावा.

आपला विश्वासू

मूळप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता.

पीएमएस.२२५९२.

प्रतिलिपी:- नगर भुमापन अधिकारी क्रमांक ३ यांजकडे रवाना.
२/- प्राधिकरणास, आवश्यक असलेली जमीन दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत सोबत

कृ.मा.पहा.